# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक.
०२० – २५६०१२६४
२५६०१२६५
ई–मेल : pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ – साफुपुवि/निववि/१५६६ दिनांक :– १४/१२/२०१५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था व
आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्था.

**विषय:– गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी अर्थसहाय्य मंजूरीबाबत**

महोदय/महोदया,

महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील विद्यापीठ संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांना कार्यालयीन,शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे खरेदी (Annexure-I), क्रीडा साहित्य खरेदी (Annexure-II), राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा, चर्चासत्रे व परिषदांचे आयोजन (Annexure-III), तसेच आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्थांना गरजेवर आधारित उपक्रमातंर्गत विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी सायकल खरेदी (Annexure -IV) इत्यादीसाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांना गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शकतत्वांस अनुसरून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे त्रृटींची पूर्तता करण्याच्या अटीवर अर्थसहाय्य मंजूर करण्यात येत आहे.

क्रीडा साहित्य खरेदी करताना फक्त भांडवली खर्चाअंतर्गत येणा–या साहित्याची खरेदी करता येईल, याची नोंद घ्यावी. सन २०१५–१६ या आर्थिक वर्षासाठी बांधकाम अर्थसहाय्य मंजूर यादी संकेतस्थळावर नंतर प्रसिध्द करण्यात येईल. परंतू ज्या महाविद्यालय/संस्थांना या योजनेंतर्गत बांधकामासाठी (सन २०१४–१५ पूर्वी) अर्थसहाय्य मंजूर झालेले आहे व त्यापोटी त्यांनी उचल रक्कम घेतलेली असून अद्यापपर्यंत बांधकाम पूर्णत्वाची कार्यवाही करून विद्यापीठास हिशोब सादर केलेले नाहीत, अशा सर्व संबंधित महाविद्यालय/संस्थांना सन २०१५–१६ या आर्थिक वर्षासाठी बांधकाम अर्थसहाय्य मंजूरी ही त्यांनी मागील बांधकामाचे सर्व हिशोब विद्यापीठास सादर केल्यानंतरच देण्यात येईल.

तसेच ज्या महाविद्यालये/संस्थांनी All India Survey of Higher Education (AISHE) व Management Information System (MIS) ची माहिती अद्याप भरलेली नाही, अशा महाविद्यालये/संस्थांनी गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांना उपरोक्त माहिती भरल्याची पोहोच प्रत सादर केल्यानंतरच अर्थसहाय्यास मंजूरी दिली जाईल.

कळावे.

उपकुलसचिव
नियोजन व विकास

सोबत – मंजूर यादी